**भूलेख संकेतस्थळावरुन आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत देण्यात येणाऱ्या विनाशुल्क संगणीकृत गा.न.नं. ७/१२ उतारे व ८ अ खाते उताऱ्यांबाबत मार्गदर्शक सुचना.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान)**
**शासन परिपत्रक क्रमांक: मातंसं-२०१९/प्र.क्र.२१/से ५/३९,**
मादाम कामा मार्ग, राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- १९ डिसेंबर, २०१९

**वाचा:-** माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दिनांक १९ जानेवारी, २०१८.

**परिपत्रक**

आपले सरकार सेवा केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या भूलेख संकेतस्थळावरुन जनतेला विनाशुल्क गा.न.नं. ७/१२ व ८ अ पाहण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर सुविधेचा आपले सरकार सेवा केंद्र चालक गैर वापर करीत असल्याचे महसूल व वन विभागाने माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या निदर्शनास आणले आहे.

गा.न.नं. ७/१२ व ८ अ संबंधित ई महाभूमी तसेच For view only असे छपाई केलेले व त्यावर आपले सरकार सेवा केंद्राने सही शिक्यानिशी अभिलेखाच्या नकलांचा होणाऱ्या गैरप्रकारास आळा बसावा यासाठी उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातुन शासन खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करीत आहे:-

१. भूलेख/ महाभूमी संकेतस्थळावरुन गा.न.नं. ७/१२ (ज्या ७/१२ व ८ अ वर View only वाटरमार्क असेल) ती माहिती फक्त माहिती साठी असून त्याच्या प्रती कोणत्याही शासकीय अथवा कायदेशीर कामासाठी ग्राह्य मानण्यात येणार नाही.

२. कोणताही आपले सरकार सेवा केंद्र चालक भूलेख/ महाभूमी संकेतस्थळावरील गा.न.नं. ७/१२ व ८ अ च्या प्रतींवर सत्यतेची पडताळणी केल्याबाबत सही शिक्का करुन वितरीत करणार नाही. अशा प्रकारची बाब निदर्शनास आल्यास संबंधित तहसिलदार यांनी त्याबाबत रितसर चौकशी करून जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करावी व जिल्हाधिकारी यांनी दोषी विरुध्द माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्र.मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दिनांक १९ जानेवारी, २०१८ च्या परिच्छेद क्र. ८ (II) व ८ (III) नुसार कारवाई करावी. तसेच यासंबंधित प्राप्त झालेल्या तक्रारीवर जिल्हाधिकारी कार्यालयानी दर ३ महिन्यांनी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडे कार्यपालन अहवाल सादर करावा.

महसुल व वन विभागाच्या अ.स.क्रं.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३८/ल-१, दि.०८/११/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९१२१९१३४७३३२०११ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jyotsna Mukund Madekar

Digitally signed by Jyotsna Mukund Madekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DIT Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4933ea9398d593ec3e965535e1a043d4fa180d8a396eba4219125dd51149b794, cn=Jyotsna Mukund Madekar
Date: 2019.12.19 15:05:09 +05'30'

**(ज्योत्स्ना मु. माडेकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१.मा.राज्यपाल यांचे सचिव,
२.मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३.सर्व मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५.सर्व अपर मुख्य सचिव/सर्व प्रधान सचिव/विशेष सचिव/सचिव,
६.प्रधान सचिव , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन , मुंबई
७.सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
८.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९.सर्व महानगरपालिका आयुक्त
१०.सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
११.सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
१२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१३.निवड नस्ती (का.३९)